# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो. पु. प्रा
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

जा.क्र.झोपुप्रा/तां.३/मा.क्र. २६३/१४४८/२०२३
दिनांक :- ०४/०८/२०२३.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) मूळ बांधकाम परवानगी दाखला (C.C.) जा.क्र. झोपुप्रा/१७२३/२०२१ दि. ११/१०/२०२१.

२) सुधारित बांधकाम परवानगी दाखला (C.C.) जा.क्र. झोपुप्रा / तां.१ /मा.क्र. २६३/ ५०३ / २०२२ दि. २१/०४/२०२२.

३) विकसक मे. आर. के. डेव्हलपर्स यांचे दि.११ /०७/२०२३ रोजीचे अंशताः भोगवटा मागणी पत्र.

४) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि. ०३/०८/२०२३ रोजीची मान्य टिपणी.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे मौजे पिंपरी वाघिरे, स.नं. १०३/२/२ब/१पै, सि.स.नं. ५१९६ राजीव गांधी नगर, पिंपरी, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील (पुनर्वसन) इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र. झोपुप्रा/१७२३/२०२१ दि. ११/१०/२०२१ अन्वये मुळ बांधकाम परवानगी व जा.क्र. झोपुप्रा / तां.१ /मा.क्र. २६३/ ५०३ / २०२२ दि. २१/०४/२०२२ नुसार दुरूस्त बांधकाम परवानगी देणेत आली आहे. बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीचे काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिका साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत विकसक मे. आर. के. डेव्हलपर्स यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मा.मु.का.अ. यांचेकडील मान्यतेनुसार देणेत येत आहे.

04-08-2023

| अ.क्र. | मजले | नकाशा मंजूरीनुसार | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | |
| | | Resi | Comm | |
| १) | ग्राउंड | ०१ सोसायटी ऑफिस +०१ Toilet | - | ०१ सोसायटी ऑफिस +०१ Toilet |
| २) | पहिला | सदनिका - १०१ ,१०२ व १०७ ते ११२ | -- | ०८ सदनिका |
| ३) | दुसरा | सदनिका - २०१ ते २१२ | -- | १२ सदनिका |
| ४) | तिसरा | सदनिका - ३०१ ते ३१२ | -- | १२ सदनिका |
| ५) | चौथा | सदनिका - ४०१ ते ४१२ | -- | १२ सदनिका |
| ६) | पाचवा | सदनिका - ५०१ ते ५१२ | -- | १२ सदनिका |
| ७) | सहावा | सदनिका -६०१ ते ६१२ | -- | १२ सदनिका |
| ८) | सातवा | सदनिका-७०१ ते ७१२ | -- | १२ सदनिका |
| ९) | आठवा | सदनिका-८०३ ते ८१२ + Refuge area | -- | १० सदनिका + Refuge area |
| १०) | नववा | सदनिका-९०१ ते ९१२ | -- | १२ सदनिका |
| ११) | दहावा | सदनिका-१००१ ते १०१२ | -- | १२ सदनिका |
| १२) | अकरावा | सदनिका-११०१ ते १११२ | -- | १२ सदनिका |
| १३) | बारावा | सदनिका-१२०२ ते १२१२ | -- | ११ सदनिका |
| | | एकूण | १३७ सदनिका + ०१ सोसायटी ऑफिस + ०१ Toilet | |

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

अटी :-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्या बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

04-08-2023

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

६) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्काची एकूण रक्कम (१००% रक्कम) टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

७) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील खुली जागा आणि सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

८) बालवाडी, वेलफेअर सेंटर व सदनिका क्र.१२०१ चे काम अंतिम भोगवटा मागणीपुर्वी पुर्ण करणे बंधनकारक आहे.

[मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांच्या
दि. ०३/०८/२०२३ रोजीच्या मान्यतेनुसार]

Slum Rehabilitation Authority Pune-Pimpri-Chinchwad Area
Technical Department
APPROVED

04-08-2023

**प्र. सहाय्यक संचालक नगररचना**
**झो.पु.प्रा., पुणे.**

प्रत :- १) **विकसक मे. आर.के. डेव्हलपर्स**
सि.स.नं. ५०२७ ते ५०२९ प्रजोल अशियाना,
नुरानी मस्जिदजवळ, नेहरूनगर,
पिंपरी, पुणे - ४११०१८.

२) **वास्तुविशारद श्री. राहुल माळवदकर**
६७२/६७३, लोकेश सोसायटी, B समर्थ बिल्डींग,
कॅनरा बँक,बिबवेवाडी, पुणे.

३) **तहसिलदार, ताबा विभाग,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४) **संगणक अधिकारी,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.